महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा
[निम्नस्तर लिपिक व सहायक]सेवाप्रवेशोत्तर
प्रशिक्षण परीक्षा नियम १९७७ आणि [अधीक्षक]
विभागीय परीक्षा नियम १९७७.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:परीक्षा-१९८७/प्र. १५२/सतरा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १५ मार्च, १९८८.

संदर्भ :- शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:इएक्सएम-२१७६/१७, दिनांक ६ जून, १९७७, इएक्सएम-१६७६/१७, दिनांक ६ जून १९७७ आणि इएक्सएम-१२७६/१७, दिनांक ६ जून, १९७७.

महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [निम्नस्तर लिपिक व सहायक] सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम १९७७ च्या नियम क्र. १३ मध्ये आणि [अधीक्षक] विभागीय परीक्षा नियम १९७७ च्या नियम क्र. १४ मध्ये एखादा निम्नस्तरीय लिपिक/सहायक पहिल्याच प्रयत्नामध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि त्याने कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविले असतील तर त्या प्रश्नपत्रिकेमधील त्याच्या विशेष योग्यतेची नोंद त्याच्या गोपनीय अहवालामध्ये घ्यावयाची तरतूद आहे. परंतु एखादा लिपिक/सहायक विहित मुदत व विहित संधी यानंतर परंतु पहिल्या प्रयत्नामध्ये सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/[अधीक्षक] विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाला व त्याला एखाद्या प्रश्नपत्रिकेमध्ये ७० टक्के किंवा अधिक गुण मिळाले तर त्याच्या त्या प्रश्नपत्रिकेतील विशेष योग्यतेची नोंद त्याच्या गोपनीय अहवालामध्ये घ्यावयाची किंवा कसे याबाबत नियमात स्पष्टीकरण नाही त्यामुळे याबाबत शासन असे स्पष्टीकरण देत आहे की, विहित संधी/विहित मुदत यांमधील पहिल्या प्रयत्नामध्ये परीक्षा उत्तीर्ण झालेल्या निम्नस्तर लिपिक/सहायकाने कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविले असतील तर त्या प्रश्नपत्रिकेमधील त्याच्या विशेष योग्यतेची नोंद त्यांच्या गोपनीय अभिलेखात घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग [आस्थापना कार्यासन]
निवड फाईल.